# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

क्रमांक : मप्रनि/ सहसंचालक (जप्रनि)/ ब-१२९८

दिनांक : २९.०३. २०१४.

प रि प त्र क

नदी क्षेत्रातील उद्योगधंदे स्थापन करण्याबाबत धोरण पुनर्विलोकन समितीच्या दि.०७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नदी खोऱ्यांच्या ना विकास क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या उद्योगांचे विस्तरीकरण, उत्पादनांची अदलाबदल, आधुनिकीकरण या बद्दल झालेल्या स्पष्टीकरणाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच इमारत बांधकाम (फक्त रहिवासी व वाणिज्य) प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा प्रक्रिया यंत्रणा इत्यादींचे स्थान याबद्दलच्या स्पष्टीकरणाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर निर्णय सर्वांच्या माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(राजीव कुमार मित्तल)
सदस्य सचिव

प्रत,

**पर्यावरण माहिती केंद्र,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई - सदरचे पत्र संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

D:\My document\EQ\WPAE Letter1.doc

**नदी खोऱ्यांच्या क्षेत्रातील उद्योगधंदे स्थापन करण्याबाबतच्या धोरण पुनर्विलोकन समितीच्या दि.०७.०६.२०१३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

**इमारत बांधकाम (फक्त वाणिज्य व घरगुती) प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा प्रक्रिया यंत्रणा इत्यादीचे स्थानाबाबत**

शासनाच्या दि.१३.०७.२००९ च्या धोरणातील परिच्छेद १२ (ब) व (क) नुसार, २०,००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम असलेले क्षेत्रविकास प्रकल्प किंवा इमारत बांधकाम प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नागरी घनकचरा प्रक्रिया यंत्रणा इत्यादीचे स्थान हे नदीच्या पूर नियंत्रण रेषेपासून अनुक्रमे १०० मीटर व ५०० मीटर अंतरापलिकडे असणे आवश्यक आहे. नदीच्या पूर नियंत्रण रेषेचे अंतर असे नसेल तर नदी पाण्याच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्याबाबत दि.१३ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये अशा प्रकल्पांना अनुमती अनुज्ञेय नाही.

दि.१३ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये ज्या नदीच्या किंवा नदी खोऱ्यांच्या समावेश करण्यात आलेला आहे, अशा नदी खोऱ्यांचे वर्गीकरण केलेल्या क्षेत्रामध्ये इमारत बांधकाम व क्षेत्रविकास प्रकल्प ज्याचे एकुण बांधकाम २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. अशा प्रकल्पासाठी धोरण पुनर्विलोकन समितीकडे पडताळणी वा निर्णय घेण्यासाठी अर्ज सदर करतांना (१) प्राधिकृत संस्थेने प्रमाणित केलेले नदी किनाऱ्यापासुन/ पूर नियंत्रक रेषेपासुनच अंतर (२) संबंधित महानगरपालिकेने/ नगरपालिकेने मंजूर केलेल्या इमारत बांधकाम नकाशावर STP/ MSW प्रक्रिया यंत्रणांचे प्रमाणित अंतर दर्शवून त्यांची क्षमता, यंत्रणेचा प्रकार व विल्हेवाट इत्यादी तपशील जोडण्यात यावा (३) पुर्नवापरानंतर शिल्लक प्रक्रियाकृत सांडपाणी महानगरपालिकेच्या/ नगरपालिकेच्या पुर्नचक्रण वा सिवर वाहिनीतील जोडणी व त्याबाबत संबंधितांचे अनुमतीपत्र सोबत जोडावे. तथापि अशा भुखंडावर नदी धोरणातील अंतरानुसार अनुज्ञेय उद्योग फक्त उभारण्यासाठी मंडळाच्या संमतीनंतर व इतर प्राधिकरणांच्या आवश्यक परवाना प्राप्त केल्यानंतर अनुमती असेल.

- - - - - - - - - - - -